
# लोक प्रशासन पत्रिका

ISSN [illegible]



वर्ष पहिले, अंक दुसरा । जुलै-डिसेंबर २०१५

// लोक प्रशासन पत्रिका

ISSN 2395-4094

वर्ष - १ : अंक - २ जुलै-डिसेंबर - २०१५

● संपादक

**शाम शिरसाट**
प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

● कार्यकारी संपादक

**जितेंद्र वासनिक**
सहायक प्राध्यापक, लोक प्रशासन व स्था.स्व.शा. विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

## वर्गणी (देणगी)

**व्यक्तीसाठी :** वार्षिक ३००/- रु.

पंचवार्षिक : १२००/- रु.

आजीवन : १०,०००/- रु.

**संस्थेसाठी :** वार्षिक ५००/- रु.

पंचवार्षिक २०००/- रु.

चेक पाठविल्यास ५० रु. वटणावळ अधिक पाठवावी. शक्यतो रक्कम लोक प्रशासन पत्रिकेच्या बँक खात्यावर सरळ हस्तांतरित करावी.

A/C Name : Lok Prashasan Patrika
Bank : Bank of India
Branch : RTM Nagpur University, Campus, Amravati Road, Nagpur-440033.
A/C No. : 876220110000048
IFSC Code : BKID0008762

**मुखपृष्ठ : पुजा मेंढेकर**

या अंकाचे मूल्य : १५०/- रु.

**संपर्क :-**
Eamil : lokprashasanpatrika@gmail.com
भ्रमणध्वनी : ९८६०४६६९२५ / ९४२२२०९४२०

● सल्लागार मंडळ

**पारस बोरा**
निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**नंदकुमार नाईक**
निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**नीलिमा देशमुख**
प्राध्यापक, लोक प्रशासन व स्था.स्व.शा. विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**वासंती रासम**
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**के. आर. बंग**
निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
वैद्यनाथ महाविद्यालय, परळी, जि. बीड.

**रमेश ढोबळे**
निवृत्त प्राध्यापक, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग,
सरस्वती भुवन कला व वाणिज्य महा., औरंगाबाद.

**सतीश दांडगे**
प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**लक्ष्मण कोत्तापल्ले**
निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

**सुभाष भिंगे**
निवृत्त प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग,
दयानंद महाविद्यालय, लातूर.

**मृदुल निळे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र व नागरिक शास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**बाबासाहेब मुंढे**
सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

©लोक प्रशासन पत्रिका

**या अंकातील मजकुराशी संपादक, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.**

# लोक प्रशासन पत्रिका

जुलै - डिसेंबर २०१५
वर्ष-१ : अंक-२

संपादकीय / ४

**मुक्तचिंतन**

सामाजिक अंकेक्षण : सर्वसमावेशी विकासाचा पाया - नितीन धाकतोडे / ६

१०० टक्के आरक्षण : सामाजिक परिवर्तनाचा राजमार्ग - जोगेंद्र गवई / १०

भारताच्या विकासात शासन व प्रशासनाची भूमिका - मुक्ता सोमवंशी / १९

**संस्मरण**

प्रोफेसर व्ही. जी. नांदेडकर - शाम शिरसाठ / २२

**लेख**

महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा : एक चिकित्सक परीक्षण - बाबासाहेब मुंढे / २४

चांगले प्रशासन अर्थात भ्रष्टाचारमुक्त समाजाची पूर्वावश्यकता - अशोक बोरकर / ३३

भारतातील प्रशासकीय संस्कृतीचे सामाजिक आधार - दयानंद अंबादास कदम / ३९

प्रशासकीय संस्कृती - प्रभाकर जाधव / ४८

वैज्ञानिक व्यवस्थापन : आधुनिक जगाला अनमोल देणगी - पी. आर. धारकर / ५३

यशवंतराव चव्हाण यांचे प्रशासकीय नेतृत्व आणि कार्य - कालिदास दिनकर फड / ५७

जलसंपत्ती व सिंचन सुविधांच्या संदर्भात महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा धांडोळा - धीरज सु. कदम / ६०

महाराष्ट्र लोकसेवा आयोग : प्रशासन आणि प्रश्न - अविनाश वानखेडे / ६७

महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रशासनातील संभ्रामक स्थिती - प्रवीण लोणारकर / ७२

विदर्भ राज्याचा अनुत्तरित प्रश्न - माधव चोले / ७६

राजकीय-सामाजिक विकेंद्रीकरण की केंद्रीकरण? नागपूर जिल्हा परिषदेच्या ओबीसी महिला सदस्यांची जातीनिहाय स्थिती - राहुल बावगे /८२

शहरी विकासात नागपूर सुधार प्रन्यासाची भूमिका प्रणया - महेंद्र पाटील / ८७

चौदावा वित्त आयोग : शिफारशी व आढावा - हितेश दडमल / ९३

**संशोधन परिचय**

महाराष्ट्रातील ग्रामीण विकास प्रशासनावर संसूचनांचा प्रभाव
योगेश भादे / ९९

**ग्रंथ परीक्षण**

कार्यक्षम सार्वजनिक सेवांसाठी प्रशासकीय नैतिकता - जयश्री बिरदवडे-भांडवलदार / १०१

*स्वतंत्र विदर्भ राज्य करणे योग्य की अयोग्य याचा अभ्यास, कारणमीमांसा स्वतंत्रपणे करता येईल तसा तो अनेकांनी केलेला आहे. खरे तर राज्ये निर्माण करण्याचा अधिकार संसदेला संविधान अनुच्छेद ३ नुसार आहे. नवीन राज्ये निर्माण करणे हे सरकारच्या इच्छाशक्तीवर अवलंबून असते. तसेच अशी छोटी राज्ये निर्माण करण्याचे भाजपाने घोषित केलेले आहे. काँग्रेसने छोट्या राज्याला विरोध केलेला आहे. तरीपण परिस्थितीनुसार काँग्रेसने छोट्या राज्यासंबंधी निर्णय घेतलेला आहे. छोट्या राज्यांचा प्रश्न हा सरकारची इच्छाशक्ती, सरकारचे बहुमत यावर अवलंबून असला तरी आघाड्यांचे सरकार आणि प्रादेशिक पक्षांचे हित यामुळे तो गुंतागुंतीचाही बनलेला आहे. केंद्रात कोणत्याही पक्षाचे सरकार आले, ते भाजपा असो की काँग्रेस समर्थक, त्यांनी विदर्भ राज्याच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केलेली आहे. याचे कारण काय आहे याचाही शोध या लेखामध्ये घेतलेला आहे.*

*माधव चोले (cholemadhav@gmail.com) हे देगलूर महाविद्यालय, देगलूर येथे राज्यशास्त्र या विषयाचे सहायक प्राध्यापक आहेत.*

भारतात ब्रिटिश आल्यानंतर त्यांनी भारतातील संस्थाने बरखास्त करून स्वतःच्या सत्तेच्या आणि महसूल गोळा करण्याच्या सोईसाठी एक मुलूख दुसऱ्या मुलूखाला जोडून बहुभाषिक, बहुसांस्कृतिक प्रांत निर्माण केलेले होते. स्वातंत्र्य आंदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात भाषिक राज्यरचनेच्या मागण्यांनी जोर धरला होता. स्वातंत्र्यानंतर आलेल्या भारत सरकारने ह्या मागण्या भारत-पाकची फाळणी, निर्वासितांचे प्रश्न, काश्मीरचा प्रश्न आणि त्यावरून पाकिस्तानशी युद्धजन्य परिस्थिती, नवीन प्रशासकीय व्यवस्था या कारणांनी टाळल्या आणि लांबणीवर टाकल्या होत्या. खरे तर विदर्भासारख्या छोट्या राज्यांचा प्रश्न दोन टप्प्यांवर अभ्यास करावा लागेल. एक म्हणजे स्वातंत्र्यानंतर एस.आर.सी. (State Reorganisation Committee) ने विदर्भ आणि तेलंगणा स्वतंत्र राज्य करण्याची शिफारस केलेली होती. कारण विदर्भ आणि तेलंगणाला स्वतंत्र महसूल प्रशासन व्यवस्था आणि संबंधित प्रांत प्रशासन होते. पण त्यावेळी विदर्भाला पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या लॉबिंग आणि केंद्रीय काँग्रेस नेत्यांच्या दबावामुळे संयुक्त महाराष्ट्राला जोडले गेले. तसेच तेलंगणालासुध्दा कोस्टल आंध्रा काँग्रेसच्या दबावामुळे संयुक्त आंध्र प्रदेशाला जोडले गेले. त्यावेळी एस.आर.सी.चे सदस्य प्रा. पणिकरांनी दोन्ही राज्ये करण्याची स्वतंत्र मतपत्रिका, आयोगाच्या शिफारशी जोडलेली होती. डॉ. आंबेडकरांनीसुध्दा पणिकरांच्या भूमिकेला आपल्या 'भाषावार प्रांतरचना' पुस्तकातून अनुमोदनच दिलेले होते. अर्थात एस.आर.सी. ने शिफारस केलेले आणि केंद्र सरकारने टाळलेले विदर्भ व तेलंगणा छोट्या राज्यांचे प्रश्न यापैकी यू.पी.ए.-२ सरकारने तेलंगणा राज्याचा प्रश्न सोडवलेला आहे. दुसऱ्या टप्प्यात १९७० च्या दशकानंतर

राजकीय भान आलेल्या विविध भाषिक, सांस्कृतिक, वांशिक, लोकसमुदायांनी आपापला प्रादेशिक पक्ष, संघटना स्थापन करून लोकशाही व्यवस्थेकडे स्वतंत्र राज्यांच्या, राज्य स्वायत्ततेच्या मागण्या मागासलेपणा, भिन्न भाषिक सांस्कृतिकपणा, राजकीय उदासीनता या कारणांनी प्रादेशिक अस्मिता म्हणून पुढे आलेल्या होत्या. उदा. गोरखालँड, बोडोलँड, जम्मू व काश्मीर, उत्तरपूर्वेकडच्या मागण्या, २०१३ मध्ये तर जवळपास ५० राज्यांच्या मागण्या पुढे आलेल्या आहेत. पण विदर्भ राज्याची मागणी हा १९७० च्या दशकानंतर प्रदेशवादातून पुढे आलेली नाही तर स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वतंत्र महसूल प्रशासन व्यवस्था, प्रांताचा दर्जा आणि मागासलेपणा या कारणांनी १०८ वर्षांपासून अहिंसेच्या मार्गाने ही मागणी चालू आहे.

विदर्भ राज्याचा प्रश्न का सुटत नाही? याची समीक्षा करताना तीन मुद्यांच्या आधारे करता येईल. (१) चळवळीला असलेला जनतेचा प्रतिसाद (२) राजकीय पक्षांच्या दुटप्पी व संदिग्ध भूमिका (३) आंदोलनाची बिघडलेली दशा व दिशा.

**१) चळवळीला असलेला जनतेचा प्रतिसाद**

**अ) आंदोलनातील लोकांचा सहभाग :** ब्रिटिश काळात मध्यप्रांतातून ८ जिल्ह्यांचे नागविदर्भ किंवा महाविदर्भ स्वतंत्र राज्य करावे यासाठी त्या वेळच्या काँग्रेस नेत्यांनी केलेल्या आंदोलनाला त्या वेळच्या जनतेच्या जाणिवेप्रमाणे व्यापक पाठिंबा मिळाला होता. विदर्भाचा एके भाषिक संयुक्त महाराष्ट्रात समावेश करावा का? स्वतंत्र विदर्भ राज्य ठेवावे? यावरून विदर्भातील काँग्रेस नेत्यांमध्ये दोन गट पडले. एका गटाने संयुक्त महाराष्ट्राची बाजू घेतली होती. तर बापुजी अणे, बियाणीजी, कन्नमवार आणि धोटे यांनी स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन केलेले होते. पण विदर्भातून संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यास पाठिंबा मिळाल्याने चळवळीवर मर्यादा पडल्या होत्या.

केंद्रीय काँग्रेस नेत्यांनी विदर्भासकट महाराष्ट्राची निर्मिती केल्यानंतर काँग्रेसच्या धोरणाला विरोध करण्यासाठी नागविदर्भ समितीमार्फत बापुजी अणे, बियाणीजी, बाबुराव हरकरे, जनरल आवारी, भाई मुखरे, राजे लालश्याम शहा, राजे विश्वेश्वरय्या यांनी तर महाविदर्भ राज्य संघर्ष समितीतर्फे जांबुवंतराव धोटे यांनी स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी आंदोलन छेडले. बंद, मोर्चे इत्यादींमुळे आंदोलन व्यापक झालेले होते.

१९६० नंतर यशवंतरावांनी विदर्भवाद्यांना विधिमंडळात भरगच्च आश्वासन दिले तसेच त्यांना मंत्रिमंडळात सामावून घेतले. त्यामुळे एकमुखी राजकारण आकाराला आले आणि आंदोलन मंदावले तर इंदिरा गांधींच्या काळात (१९७० ते १९८५) जांबुवंतराव धोटे यांनी स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन विदर्भाच्या कानाकोपऱ्यात नेऊन पोहचवले. ठिकठिकाणी सभा, बैठका, मोर्चे काढले होते. त्याला जनतेने उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला होता पण धोटेंना इंदिरा गांधीजींनी नागपूर लोकसभेची जागा दिली. धोटे फॉरवर्ड ब्लॉक पक्षांसह इंदिरा काँग्रेसमध्ये विलीन झाले (१९७८). त्यामुळे आंदोलनाचा जोर ओसरला.

युती सरकारच्या काळात काँग्रेस नेत्यांनी युती सरकारला अडचणीत आणण्यासाठी स्वतंत्र राज्याची चळवळ सुरू केली होती; पण हे आंदोलन फक्त कार्यकर्त्यांपर्यंत सीमित होते. सर्वसामान्य जनतेपर्यंत गेलेले नव्हते. पुढे रालोआ सरकारने तीन राज्ये निर्माण केल्यानंतर विदर्भ राज्य संघर्ष समिती, विदर्भ गण परिषद, विदर्भ मुक्ती मोर्चाने ठिकठिकाणी आंदोलन केले. याला शिवसेना, डाव्या पक्षांचा अपवाद वगळता सर्वांनी पाठिंबा दिला होता; पण ही चळवळ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचलेली नव्हती.

तेलंगणा आंदोलनापाठोपाठ २० जानेवारी २०१० रोजी सर्वपक्षीय बंद पाळण्यात आला. या बंदला शिवसेना, मनसे आणि डाव्यांचा अपवाद वगळता सर्व पक्षांनी तात्पुरता का होईना पाठिंबा दिला होता आणि हा बंद काही प्रमाणात यशस्वीही झालेला होता. तेलंगणा घोषणेनंतर (३१ जुलै २०१३) विदर्भ राज्याचे आंदोलन सुरू झाले. मात्र हे आंदोलन एकत्र येऊन नव्हे तर पक्षीय स्तरावर होते. फक्त श्रेष्ठींना भेटणे, लेखी पत्र देणे, असे मर्यादित झालेले होते. केंद्रातल्या - सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी या मुद्यावर बोलण्याचेही टाळले होते हे लक्षात घ्यावे लागेल.

मात्र 'सकाळ' ह्या वर्तमानपत्राने २००३ मध्ये केलेल्या

सर्वेक्षणातून विदर्भ जनतेचा कौल स्वतंत्र विदर्भ राज्यांच्या बाजूने घेतला. अमरावतीत २०१३ मध्ये 'विदर्भ माझा' आणि एका समाजकार्य महाविद्यालयाने घेतलेल्या जनमत चाचणीत ८५% लोकांनी विदर्भाच्या बाजूने कौल दिला होता तर १२% लोकांनी विरोध केलेला होता. जनमत चाचणीत लोकांनी कौल विदर्भाच्या बाजूने दिला तरी आंदोलनातील लोकांचा मर्यादित सहभाग, निवडणुकीतील विदर्भवादी पक्षांचे अपयश यांचे उत्तर कुठे शोधायचे हा प्रश्न पडतो.

एकंदरीत मध्यप्रांतातून नागविदर्भाची मागणी होत असताना काँग्रेस नेत्यात एकजूट होती. पण नंतर स्वतंत्र विदर्भासाठी झालेल्या आंदोलनावर सुरुवातीपासूनच मर्यादा पडत गेल्या. त्यात स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर विदर्भातील काँग्रेस नेत्यात एकमत नव्हते. तर दोन गट पडले होते. तसेच विदर्भवादी नेत्यांनी काँग्रेसमध्ये राहूनच आंदोलन चालविले, अनेक नेते सतत होणाऱ्या पराभवाला कंटाळून काँग्रेसमध्ये गेले. त्याचप्रमाणे सुरुवातीच्या काळात बापुजी अणे, ब्रिजलाल बियाणी आणि जांबुवंतराव धोटे यांचा अपवाद वगळता स्वतंत्र विदर्भासाठी अन्य नेत्यांनी केलेल्या आंदोलनाला स्थानिक जनतेनी पाठिंबा दिला नाही. त्यामुळे आंदोलनातील लोकांचा सहभाग वरचेवर कमी होत गेलेला आहे. आतातर हे आंदोलन बुध्दिजीवी, काही कार्यकर्त्यापर्यंत सीमित झालेले आहे.

### ब) निवडणुकीतील राजकीय पक्षांचे यश/अपयश

स्वतंत्र विदर्भ समर्थक राजकीय पक्षांनी विदर्भातील संपूर्ण जागा कधीच लढविल्या नाहीत. ज्या काही लढविल्या त्या जागेवरील उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झालेल्या आहेत. अपवादाने चंद्रपूरमध्ये एक-दोन जागा जिंकल्या आहेत. त्यात महाविदर्भ राज्य संघर्ष समिती, विदर्भ समाजवादी फोरम, विदर्भ नवनिर्माण सेना यांचा समावेश होतो. स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर निवडणुका लढवून सारखे अपयश आल्याने वसंतराव साठे (पक्ष प्रजासमाजवादी) यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. विदर्भाच्या मुद्यावर बापूजी अणे, टी.जी. देशमुख आणि जांबुवंतराव धोटे हे १९७८ ला काँग्रेसमध्ये गेलेले होते. नंतर ते परत फॉरवर्ड ब्लॉक पक्षामध्ये आले. स्वतंत्र मुद्यावर राजे विश्वश्वरराव हे १९५७ ते १९७७ अशी २० वर्षे सतत आमदार म्हणून चंद्रपूरमधून निवडून आलेले आहेत. पण त्यांना विदर्भाच्या मुद्यावर जनचळवळ उभी करता आलेली नाही. १९९५ ची निवडणूक भाजपाने स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर लढविली. त्यांनी सत्ताही मिळविली पण युतीतील शिवसेनेच्या आडकाठीमुळे भाजपालाही संदिग्ध भूमिका घ्यावी लागली. स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर पक्षांतरही झालेले नाही. ज्याप्रमाणे तेलंगणात झाले. टी.डी.पी. काँग्रेस आणि बी.जे.पी. चे आमदार, खासदार टी.आर.एस.मध्ये गेले होते. उलट विदर्भात स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर वारंवार निवडणुकीत पराभव झाल्याने काँग्रेसमध्ये नेत्यांनी पक्षांतरे केलेली आहेत. ज्याप्रमाणे तेलंगणात स्वतंत्र तेलंगणासाठी विविध पक्षांच्या आमदारांनी राजीनामे दिलेले आहेत तसे विदर्भात झालेले नाही. एकंदरीत निवडणुकीच्या राजकारणात विदर्भाच्या मुद्यावर कोणत्याही पक्षाला यशच आलेले नाही.

### क) सामाजिक-सांस्कृतिक आधार

तेलंगणा राज्याची चळवळ सामाजिक-सांस्कृतिक आधारामुळे जनचळवळ झालेली होती. त्यासोबत विदर्भाची तुलना करताना विदर्भात कोणत्याच पक्षाने विदर्भ विकासाची आघाडी करून हा प्रश्न मनःपूर्वक धसास लावण्याचे मनावर घेतलेले नाही. लोकनायक बापुजी अणे आणि ब्रिजलाल बियाणी यांच्यानंतर जांबुवंतराव धोटे सोडले तर वैदर्भीय जनतेने विदर्भ भावनेत अन्य कोणत्याही लोकनेत्यांवर विश्वास ठेवला नाही. चळवळीला लोकभावनेची जोड पाहिजे असते. लोकभावना जागृत होण्यासाठी लोकसाहित्य, कला, संस्कृती, सण, उत्सव यांच्या यात्रा या माध्यमाची जोड देऊन चळवळ करावी लागते. तशी विदर्भ राज्याची चळवळ झालेली नाही. विदर्भ चळवळही नेते, कार्यकर्ते आणि विधिमंडळ अधिवेशनपूर्ती मर्यादित राहिली आहे. खरा प्रश्न विदर्भाच्या विकासाचा आहे.

### २) राजकीय पक्षांच्या दुटप्पी व संदिग्ध भूमिका

सत्तेच्या समिकरणात (केंद्रीय आणि राज्य राजकारणात) पक्षांच्या सत्तावादी भूमिकेत कसा बदल झालेला आहे. राजकीय पक्षांच्या सत्तेच्या राजकारणातील दुटप्पी भूमिकेमुळे विदर्भ राज्यांचा प्रश्न कसा ताटकळत

राहिलेला आहे. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

**काँग्रेस**

काँग्रेसने सुरुवातीपासून आपली सत्ता स्थिर करण्यासाठी आणि प्रभुत्व कायम ठेवण्यासाठी विदर्भाचा दुहेरी वापर केलेला आहे. राज्य पुनर्रचना आयोगाने स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस केलेली होती पण तसे न करता काँग्रेसने द्विभाषिक मुंबई राज्यात काँग्रेसची सत्ता वाचविण्यासाठी काँग्रेसनिष्ठ विदर्भ मुंबईला जोडण्यात आला. पुढे १९५७ ला यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार निर्माण करण्यासाठी विदर्भाचा वापर केला. यशवंतरावांनी शासकीय स्तरावर विकासाचे भरभरून आश्वासन देऊन विदर्भवाद्यांना मंत्रिमंडळात घेतले. त्यामुळे स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ धूसर झाली होती. कमकुवत केली होती. त्याचे बळी जांबुवंतराव धोटे झालेले होते. राजीव गांधींनी स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करण्याचे सूचित केले होते. पण विदर्भ वेगळा झाल्यास मुंबईवरील सत्ता जाईल, म्हणून विदर्भातील नेत्यांनीच भीती व्यक्त केली होती. युती शासनाच्या काळात युतीला अडचणीत आणण्यासाठी विदर्भातील काँग्रेस नेत्यांनीच एकजुटीने स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन चालविले होते. रालोआच्या काळात सुरुवातीला काँग्रेसने स्वतंत्र विदर्भाचे समर्थन केले. पण संसदेत स्वतंत्र विदर्भ राज्याला विरोध केला. कारण काँग्रेस विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रात अल्पमतात होती. तसे झाले असते तर उर्वरित महाराष्ट्रातील सत्ता हातची गेली असती. अर्थात काँग्रेसने विदर्भाचा मुद्दा सत्तेच्या राजकारणासाठी वारंवार वापरलेला आहे. सध्या काँग्रेसने संदिग्ध भूमिका घेऊन हा मुद्दा दाबला आहे. विदर्भवादी काँग्रेसच्या नेत्यांनी काँग्रेसमध्येच राहून सत्ता उपभोगून स्वतंत्र विदर्भाची मागणी व्यक्तिगत स्तरावर करून विदर्भ करण्याची जबाबदारी श्रेष्ठींवर सोपवून दिलेली आहे. विदर्भासाठी राजीनामे देऊन, पक्षातून बाहेर पडून, संघटन करून मोठे आंदोलन उभे केलेले नाहीत. विदर्भातील काँग्रेसमधील नाशिकराव तिरपुडे, टी.जी. देशमुख, एन.के.पी. साळवे, वसंत साठे या सर्व राजकीय नेत्यांनी सत्तासुख उपभोगून उतरत्या वयात विदर्भाचा मुद्दा लावून धरला होता. सध्या काँग्रेसची संदिग्ध भूमिका आहे. कारण वेगळा विदर्भ झाला तर उर्वरित महाराष्ट्रात सत्तेसाठी सोयीस्कर होणार आहे. त्याचा फटका काँग्रेसला बसणार आहे. त्यामुळे ठोस भूमिका न घेता जनतेचा पाठिंबा कायम ठेवण्याचा प्रयत्न आहे.

**भाजपा**

भाजपाने सुरुवातीपासूनच राष्ट्रीय स्तरावर आणि पक्षांच्या जाहीरनाम्यात प्रशासकीय सुलभतेसाठी छोट्या राज्यांचे समर्थन केलेले आहे. महाराष्ट्रात स्वतत्र विदर्भाच्या मुद्यावर ठाम भूमिका घेतली आहे. पण महाराष्ट्रातील शिवसेनेसोबतच्या प्रादेशिक राजकारणाच्या युतीसाठी माघार घेणे ही मुख्य अडचण भाजपाची आहे. सेना अखंड महाराष्ट्रवादी आहे. त्यामुळे विदर्भ राज्यांच्या मुद्यावरून शिवसेनेची युती तुटते म्हणून भाजपा मौन बाळगून राहते. महाराष्ट्रात सत्तेत यायचे तर शिवसेनेशिवाय शक्य नाही. सत्तेचा मोह भाजपाला सोडवत नाही. विदर्भ राज्याच्या नावाने राज्यात भाजपाची सत्तेत राहून आणि विरोधी बाकात राहून अडचण झालेली आहे. सद्य:स्थितीत काँग्रेसप्रमाणेच भाजपासुध्दा विदर्भाच्या मुद्यावर एकत्रित येणे, पत्रव्यवहार करणे, श्रेष्ठींना भेटणे यापलीकडे स्वतंत्र विदर्भासाठी मोठे जनआंदोलन उभा करणारा भाजपामध्ये एकही नेता नाही. नितीन गडकरी तर आता कायम दुरावल्यागत झाले आहेत तर देवेंद्र फडणवीस कधी-कधी आपले अस्तित्व दाखवून देण्यासाठी प्रयत्न करतात.

**शिवसेना**

शिवसेनेची मराठी भाषा, भूमिपुत्रांचा सिद्धांत हा वैचारिक आधार आहे, सेनेने मराठी भाषेचे एकच राज्य असले पाहिजे, दोन राज्ये करण्याला स्पष्ट विरोध केलेला आहे. त्यामुळेच सेनेने स्वतंत्र विदर्भ राज्य करण्याला विरोध केलेला आहे. स्वतंत्र विदर्भाची मागणी ही अमराठी लोकांची आहे. स्वतंत्र विदर्भ झाले तर अमराठी मुख्यमंत्री होईल आणि त्याचाच प्रभाव वाढेल. शिवसेनेने युतीची सत्ता असताना भाजपाला स्वतंत्र विदर्भ राज्य करण्याला संसदेत विरोध केलेला आहे. शिवसेनेला मराठी भाषेच्या मुद्यावर विदर्भ, मराठवाडा, कोकणात यशही मिळालेले आहे. त्यामुळे या मुद्यामुळे पक्षाचे हितही आहे.

**साम्यवादी पक्ष (CPI, CPM)**

साम्यवादी पक्षाने सरसकट छोट्या राज्यांचे समर्थन न करता प्रत्येक राज्याबाबत गुणवत्तेवर निर्णय घेण्याची भूमिका घेतलेली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने छत्तीसगड आणि तेलंगणाला मान्यता दिलेली आहे. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने पश्चिम बंगालमधून गोरखालँड देण्याला विरोध केला आहे. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळात हे दोन्ही पक्ष एकच होते. या पक्षाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वाचे योगदान दिलेले होते. १०५ हुतात्म्यांपैकी बहुसंख्य कार्यकर्ते याच पक्षाचे होते म्हणून या पक्षाने संयुक्त महाराष्ट्र कायमच राहिला पाहिजे, अशी भूमिका या पक्षाने घेतलेली आहे. या भूमिकेला मार्क्सवादी अभ्यासक डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी विरोध केलेला आहे. शेकाप पक्षानेही संयुक्त महाराष्ट्राचे तुकडे न होता तो अखंड राहिला पाहिजे, त्यासाठी जयंती पाटील यांनी विधान परिषदेत महाराष्ट्र अखंड राहिला पाहिजे असा ठराव संमत करावा अशी भूमिका घेतलेली होती.

**मनसे**

मनसेची या मुद्यावर तळ्यात-मळ्यात अशीच भूमिका राहिली आहे. कारण विदर्भातून जास्त आमदार निवडून येण्याची फारशी आशा दिसत नाही. तरीसुध्दा विदर्भासंबंधी सार्वमत घ्यावे. त्यात जनतेचा कौल स्वतंत्र विदर्भाच्या बाजूने असल्यास आमचा पाठिंबा राहील अशी भूमिका राज ठाकरेंनी घेतली आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस**

राष्ट्रवादी काँग्रेसने स्वतंत्र विदर्भाला जनतेचा व्यापक पाठिंबा मिळत नाही म्हणून तसेच आपल्या पक्षाला विदर्भात मिळणार पाठिंबा नगण्य असल्याकारणाने संदिग्ध भूमिका घेतली आहे. स्वतंत्र विदर्भ हवा असेल तर तो देऊ अशी सावध भूमिका शरद पवारांनी घेतलेली आहे. स्वतंत्र विदर्भ झाल्यास उर्वरित महाराष्ट्रात एकतर्फी सत्ता स्थापण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला स्वतंत्र विदर्भ हवाच आहे. पण या मुद्यावर राष्ट्रवादी पक्षाने आंदोलन उभे केलेले नाही. सध्या विदर्भातील निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविण्यावरून, जलसिंचनाच्या घोटाळ्यावरून राष्ट्रवादीची प्रतिमा विदर्भात मलिन झालेली आहे. त्यामुळे २०१५ च्या निवडणुकीत फटका बसलेला आहे. विदर्भातील इतर काही पक्षांनी, समित्यांनी स्वतंत्र विदर्भाची बाजू दीर्घकाळापासून भक्कमपणे लावून धरली आहे. पण पक्षांची ताकद/क्षमता सरकारला वाकवण्याइतकी नाही. त्यात भारिप बहुजन महासंघ, स्वतंत्र भारत पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक पक्ष, जनता दल युनायटेड, आर.पी.आय., विदर्भ समाजवादी फोरम आणि विदर्भ नवनिर्माण सेना इत्यादी.

एकंदरीत कमकुवत राजकीय पक्ष वगळता राजकीय पक्षांच्या ठाम व निर्णायक भूमिकेचा अभाव, थकलेले ज्येष्ठ विदर्भवादी नेते, राजकीय पक्षांच्या प्रभावाची बदललेली गणिते यामुळे परिस्थिती स्वतंत्र विदर्भ राज्याच्या विरोधी आहे. विदर्भ राज्याचा मुद्दा, नेते सत्ता गेली की, पद गेले की, निवडणूक आली की आणि नागपूर अधिवेशनात हा मुद्दा रंगतो आणि नंतर सर्वकाही आलबेल होते. असा आजपर्यंतचा अनुभव आहे.

**३) आंदोलनाची विघडलेली दशा-दिशा**

विदर्भ राज्याचे आंदोलन व्यापक का झाले नाही? आंदोलनाला जनतेचा पाठिंबा का मिळाला नाही? यांचा शोध घेतल्यास आंदोलनाला एक कार्यक्षम नेतृत्व मिळाले नाही. काही काळ बापूजी अणेंचे नेतृत्व मिळाले होते पण नंतरच्या काळात पक्षीय मतभेद विसरून ताकदीने दीर्घकाळ लढणारे एकहाती नेतृत्व मिळाले नाही. ज्या पक्ष आणि संघटनांचा स्वतंत्र विदर्भ राज्याला पाठिंबा मिळाला त्यांची ताकद फारच कमी आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र विदर्भाचे समर्थन करणारा एकही प्रभावी पक्ष विदर्भात नाही. भाजपाने समर्थन केले, मात्र निवडणुकीत स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा न घेता इतर मुद्यांवर भर दिला. युतीतील शिवसेनेचा स्वतंत्र विदर्भाला स्पष्ट विरोध असल्याने प्रादेशिक राजकारणासाठी भाजपाला नमती भूमिका घ्यावी लागते. महाविदर्भ राज्य संघर्ष समितीने विदर्भातल्या पूर्ण जागा कधीच लढविल्या नाहीत. काही लढविल्या त्या जागावरील उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या आहेत. अपवादाने एक, दोन जागा चंद्रपुरमध्ये मिळाल्या आहेत. विदर्भवादी नेते हे वारंवार दुटप्पी भूमिका घेत आलेले आहेत. प्रभावी ठोस भूमिका एकाही नेत्याने घेतली नाही. काही नेत्यांनी द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाल्यानंतर

संयुक्त महाराष्ट्राच्या चवळवळीत भाग घेतला नाही. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीकडे दुर्लक्ष केलेले होते. विदर्भात काँग्रेसचा प्रभाव जास्त राहिलेला आहे. काही विदर्भवाद्यांनी काँग्रेसमध्ये राहून सत्तास्थाने प्राप्त करून, विदर्भाची मागणी केलेली होती. मात्र काँग्रेसने स्वतःचे सरकार स्थिर करण्यासाठी व आपला प्रभाव शाबूत राहण्यासाठी वारंवार विदर्भ राज्याचा बळी दिलेला आहे. स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन करणारे काही नेते आपल्या निवडणुकीत होणाऱ्या सारख्या पराभवाला कंटाळून, आपला राजकीय अंत होईल म्हणून काँग्रेसमध्ये प्रवेश करून मंत्रिपदे प्राप्त केलेली आहेत. अशा दुटप्पी भूमिकेमुळे विदर्भाचे आंदोलन व्यापक होऊ शकले नाही. विदर्भ राज्य चळवळीला अपयश हे विदर्भवाद्यांची दुटप्पी भूमिका आणि विदर्भातूनच अखंड महाराष्ट्राची मागणी यामुळे आलेले आहे. सध्या तर दोन्ही प्रभावी पक्ष, विदर्भाच्या मुद्यावर बैठका, पत्रव्यवहार आणि शिष्टमंडळ घेऊन वरिष्ठांना भेटणे, इतपर्यंतच मर्यादित झालेले आहेत.

**संदर्भ**


१. श्रीनिवास खांदेवाले (२०१२) : *विदर्भ राज्य संकल्पना,* (विसा बुक्स, नागपूर).
२. द.ना. धनागरे (२०११) : *स्वतंत्र विदर्भ राज्य : ध्यास-विचार आणि चळवळ,* नवभारत (जुलै).
३. श्रीपाद भालचंद्र जोशी (२०१३) : *वेगळा विदर्भ की अखंड विदर्भ? एका वादाची सद्यःस्थिती,* (मुंबई : ग्रंथाली प्रकाशन).
४. सुहास कुलकर्णी (२००७) : मिलिंद चंपानेरकर (२०१३) : *असा घडला भारत,* विदर्भ प्रश्न व नागपूर करार, (पुणे : रोहन प्रकाशन).
५. य.दि. फडके (२००७) : *विसाव्या शतकातील महाराष्ट्र,* खंड सहावा, खंड सातवा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ (१९४८ ते १९६०), (पुणे : मौज प्रकाशन).
६. तुकाराम जाधव (संपा) (२००८-०९) : महाराष्ट्र वार्षिकी, स्वतंत्र विदर्भ राज्याची चळवळ, हेमंत कडूरकर, (पुणे : युनिक ॲकडमी).
७. अनिल वासनिक (२०१०) : *विदर्भ राज्य : वास्तव आणि विपर्यास,* नागपूर.
८. सुरेश द्वादशीवार (१४ ऑगस्ट २०१०) : तर विदर्भाने महाराष्ट्रासोबत राहायचे कशाला? साधना, पुणे.
९. मधुकर किंमतकर (१४ ऑगस्ट २०१०) : भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही, विदर्भाला सुखी करा, साधना, पुणे.
१०. बबन लाव्हात्रे (२०१२) : विदर्भ राज्याचे खच्चीकरण, (नागपूर : प्रबुद्ध प्रकाशन).
११. हेमंत कडूकर (२००६) : विदर्भाचे मागासलेपण : वि.वै. विकास मंडळाची भूमिका, राज्यशास्त्र व लोक प्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, अप्रकाशित (M.Phil.) प्रबंध.
१२. दै. लोकमत, देशोन्नती, २१ जानेवारी २०१०, नागपूर.
१३. लोकसत्ता, ५ व ६ ऑगस्ट २०१३, मुंबई.
१४. महाराष्ट्र टाइम्स, २४ ऑगस्ट २०१३, मुंबई
१५. दै. सकाळी, १२ ऑक्टोबर २०१३, अमरावती
१६. मोरेश्वर बडगे (३१ जुलै २०१३) : विदर्भ राज्य - किती जवळ किती दूर? दै. लोकमत नागपूर.
१७. लोकसत्ता, १ ऑगस्ट २०१४, मुंबई.
१८. संतोष प्रधान (६ ऑगस्ट २०१३), विदर्भाची राजकीय पोळ, लोकसत्ता, मुंबई.
१९. दैनिक लोकमत (२१ जानेवारी २०१०), नागपूर.
२०. सकाळ (४.१०.२०१३), दैनिक सकाळच्या सर्वेक्षणाचा धक्कादायक निष्कर्ष, नागपूर.
२२. मदन धनकर (१४ ऑगस्ट २०१०), विदर्भ राज्यवादी नेतृत्व विदर्भाला सुखी करा, साधना, पुणे.
२३. मोरेश्वर बडगे (एप्रिल २०१३), विदर्भ राज्य मागणारे थकले, दै. लोकमत, औरंगाबाद.


●●●

## नम्र निवेदन

सर्व हितचिंतक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मित्रांना नम्र निवेदन आहे की, त्यांनी लोक प्रशासन पत्रिकेला आर्थिक सहाय्य देणगी, वर्गणी, आजीवन वर्गणी व जाहिरातीच्या स्वरुपात देऊन पत्रिकेची पुढील वाटचाल सशक्त करावी.

**संपादक**